विरोधकांची पदयात्रा

'एसआयआर'बाबत मल्लिकार्जुन खर्गे यांचे उपसभापतींना पत्र

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

बिहारमधील मतदारयाद्या पडताळणीच्या मुद्द्यावर (एसआयआर) संसदेत चर्चा व्हावी, या मागणीसाठी गेल्या दीड आठवड्यापासून संसदेचे कामकाज रोखून धरणाऱ्या विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांनी बुधवारी संसद भवनापासून विजय चौकापर्यंत पदयात्रा काढली. हा मुद्दा कोट्यवधी मतदारांसाठी, विशेषतः समाजातील कमकुवत घटकांसाठी अत्यंत चिंतेचा असुनही त्यावर चर्चेस परवानगी का मिळत नाही, असा प्रश्न राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी उपसभापती हरिवंश नारायण सिंह यांना आणखी एका पत्राद्वारे केला.

'एसआयआर'विरोधात विरोधकांनी संसदेत गोंधळ घातल्यामुळे बुधवारी दोन्ही सभागृहांचे कामकाज गुरुवारपर्यंत तहकूब करावे लागले. या गदारोळातच सरकारने दोन्ही सभागृहांत एकेक विधेयक चर्चेविना, आवाजी मतदानाने मंजूर केले. विरोधी पक्ष 'एसआयआर'च्या मुद्द्यावर चर्चा करण्याच्या मागणीवर ठाम असल्याने 'ऑपरेशन सिंदूर' वरील चर्चा आणि पावसाळी अधिवेशनात काही विधेयके मंजूर करण्याव्यतिरिक्त कामकाजच होऊ शकलेले नाही. २१ जुलैपासून रोज्च्या गोंधळाने शून्यप्रहर व प्रश्नोत्तर तास राज्यसभेत एकदाही पूर्ण चालू शकलेला नाही.

विरोधकांच्या पदयात्रेत 'इंडिया' आघाडीतील सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते. खर्गे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, सर्व विरोधी पक्षांना बिहारच्या संशयास्पद एसआयआर प्रक्रियेवर चर्चा हवी आहे. आम्ही सर्वजण सतत आणि शांततेने उपसभापती, लोकसभाध्यक्ष व सरकारला, आमची मते चोरीला जाऊ नयेत, अशी विनंती करत आहोत. मुद्दा हा आहे की हे सरकार बिहारमध्ये मते कापू इच्छित आहे, महाराष्ट्रात ती वाढवू इच्छित होते आणि कर्नाटकमध्ये यांनी वेगळ्याच प्रकारचा फेरफार केला आहे. मतदारयादीत प्रचंड तफावत आहे. संसदेत यावर संपूर्ण चर्चा झाली तर आम्ही देशाच्या हितासाठी सूचना देऊ शकतो.'

खर्गे यांनी हरिवंश यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'याआधीच्या सभापतींच्या (जगदीप धनखड) एका निर्णयामुळे वरिष्ठ सभागृहाला 'जगातील प्रत्येक गोष्टीवर, एका विशिष्ट निर्बंधासह' चर्चा करण्याची परवानगी मिळाली आहे. निवडणूक आयोगाकडून मतदारयाद्यांची पडताळणी सध्या बिहारमध्ये सुरू आहे आणि नंतर पश्चिम बंगाल, आसाम आणि इतर राज्यांमध्येही हीच प्रक्रिया केली जाईल. पावसाळी अधिवेशाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षांचे खासदार सभागृहात यावर तातडीने चर्चा करण्याची मागणी करत आहेत काारण हा मुद्दा कोट्यवधी मतदारांसाठी, विशेषतः समाजातील कमकुवत घटकांसाठी अत्यंत चिंतेचा विषय आहे.'

विरोधकांनी बुधवारी काढलेल्या पदयात्रेत सहभागी खासदार.

'सभागृहात चर्चा होऊ शकत नाही'

सरकारने 'एसआयआर' मुद्दावर संसदेत नियमानुसार सध्या चर्चा होऊच शकत नसल्याचा पुनरूच्चार केला. 'एसआयआर'वर लोकसभेत किंवा राज्यसभेत तूर्तास चर्चा करता येत नाही. कारण हा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. नियमांनुसार न्यायालयात प्रलंबित असलेल्या अशा मुद्द्यांवर सभागृहात चर्चा करण्याची परवानगी नाही', असे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले.

'एक असण्यासाठी एकसारखे होण्याची गरज नाही'

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

'एक असण्यासाठी एकसारखे होण्याची गरज नाही. धर्म आपलेपणा आणि विविधतेचा स्वीकार शिकवतो. आपण वेगवेगळे दिसत असलो, तरी एक आहोत,' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी बुधवारी केले.

धर्मजागरण न्यासच्या नवनिर्मित लोकायोग सोहळ्या भगवानगरप येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी सरसंघचालक बोलत होते. धर्म म्हणजे काय हे उलगडून सांगताना सरसंघचालक भागवत म्हणाले, 'धर्म म्हणजे सत्य आणि कर्तव्य आहे. धर्माचे कार्य देवापुरते मर्यादित नसून, ते समाजासाठी आहे. एकमेकांच्या विविधता समजून घेत जगायचे धर्म शिकवितो. हे सर्वांत आधी हिंदू समाजाला उमगले म्हणून त्यांनी स्वीकार केला. वास्तविक पाहता हा सृष्टीधर्म, मानवधर्म आहे. सनातन धर्म हा आत्मीयता व विविधतेचा पूर्ण स्वीकार करणे शिकवतो. भारतात विविधता असली, तरी शेवटी सर्व लोक एकच आहेत'.

'सर्व विविधतांचा स्वीकार करणे हाच खरा धर्म आहे. सर्वांचा मार्ग वेगवेगळा असला तरी गंतव्य एकाच जागी असते. त्यामुळे इतरांचा स्वतंत्र बदलण्याचा प्रयत्न करायला नको', असेही भागवत म्हणाले.

'धर्म वाचविण्यासाठी बलिदान देणारे आदर्शच'

'धर्म म्हणतो कर्तव्य हा आपला विचार आहे. त्यातूनच राजधर्म, प्रजाधर्म, पितृधर्म या गोष्टी समोर आल्या. अनेकांच्या जीवनात कठीण प्रसंग येतात व त्यांचे धैर्य तुटते. त्यातून ते सन्मार्ग सोडतात. पण, पुरुषार्थी लोक न थकता व न थांबता पूर्ण शक्ती लावून धर्मप्रति पक्के राहतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात संकटे आली, पण त्यांनी शक्ती व युक्तीने मार्ग काढलाच. मनुष्याच्या मनात धर्माची निष्ठा पक्की हवी. धर्मासाठी अनेकांनी बलिदान दिले आहे. त्यांच्यावर अत्याचार झाले, पण त्यांनी धर्म सोडला नाही. असेच लोक आपल्यासमोरील आदर्श आहेत', असे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले.

'वगळलेल्या ६५ लाख मतदारांची यादी द्या'

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

बिहारमध्ये निवडणूक आयोगाने प्रारूप मतदारयादी जाहीर केली असून त्यातून ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. वगळण्यात आलेल्या या सर्व मतदारांची यादी सादर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी निवडणूक आयोगाला दिले.

बिहारमध्ये वर्षअखेरीस विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यासाठी सात कोटींहून अधिक मतदारांची विशेष सखोल पडताळणी करण्याची मोहीम निवडणूक आयोगाने हाती घेतली आहे. त्याची पहिली प्रारूप यादी १ ऑगस्ट रोजी जाहीर झाली. त्यातून ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या स्वयंसेवी संस्थेने वगळलेल्या मतदारांची सद्यःस्थिती काय आहे, ते मृत झाले आहेत की अन्यत्र कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत की, आणखी काही कारणे आहेत, याचा तपशील देण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला देण्यात यावेत, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. त्यावरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्य कांत, उज्ज्वल भुयान आणि एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने वगळलेल्या मतदारांची यादी सादर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले. स्वयंसेवी संस्थेतर्फे युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी काही राजकीय पक्षांनी वगळलेल्या मतदारांची यादी याआधीच दिली असून संबंधित मतदार मृत झाले आहेत की स्थलांतरित, हे समजू शकलेले नाही, असे सांगितले.

भूषण यांच्या या युक्तिवादावर सर्वोच्च न्यायालयाने 'आम्ही या प्रकरणात लक्ष घालून आवश्यक ती माहिती संकलित करू. निवडणूक आयोगाने यावर शनिवार, ९ ऑगस्टपर्यंत यावर उत्तर सादर करावे आणि भूषण यांनी ते पाहावे. त्यानंतर त्यातून काय उघड करायचे आणि काय नाही, याचा निर्णय घेऊ', असे स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयात १२ आणि १३ ऑगस्टला सुनावणी होईल.

सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

वडाचे झाड कापल्याने बँक अधिकाऱ्यांवर गुन्हा

नागपूर : येथील वडाचे पुरातन झाड कापल्याप्रकरणी पंजाब नॅशनल बँकेच्या मुख्य व्यवस्थापकासह दोघांविरुद्ध सदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. एकाच वेळी दोन अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने बँकेत खळबळ उडाली आहे. अधिषेक ददरया आणि शैलेंद्र गुप्ता, अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. मुख्य व्यवस्थापक अभिषेक ददरया तर उपमंडळ प्रमुख शैलेंद्र गुप्ता अशी त्यांची नावे आहेत. महापालिकेचे उद्यान अधीक्षक अमोल हरीणखंड चोरपगार यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहननगरमधील किंमसवे परिसरात पंजाब नॅशनल बँक आहे. बँकेच्या परिसरात हे वडाचे झाड आहे. काही दिवसांपूर्वी हे झाड जमिनीपासून कापण्यात आले. ४ ऑगस्टला याबाबत तक्रार करण्यात आली होती.

विमानाच्या इंजिनाला पक्षी धडकला

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुण्याहून भुवनेश्वरला निघालेल्या (आरएक्स १०९८) या विमानाच्या इंजिनला उड्डाणाच्या वेळी धावपट्टीवर पक्षी धडकल्याची (बर्ड हिट) घटना घडली. याभ्येष एका बाजूच्या इंजिनमधील पाच ब्लेड निकामी झाले. पायलटला हा प्रकार वेळीच लक्षात आल्यानंतर त्याने उड्डाण न करता विमान थांबवल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. शेवटी हे उड्डाण रद्द करण्यात आले. पुणे विमानतळावर 'बर्ड हिट' मुळे प्रवासी सुरक्षेचा मुद्दा पुन्हा समोर आला आहे.

पुण्याहून एअर इंडिया एक्सप्रेसचे आरएक्स १०९८ विमान भुवनेश्वरला सायंकाळी चार वाजून पाच मिनिटांनी उड्डाण करणार होते. या विमानाभ्येष दीडशेपेक्षा जास्त प्रवासी होते. विमानाने नियोजित वेळेत उड्डाणाची तयारी करून धावपट्टीवर गेले. उड्डाणासाठी वेग पकडल्यानंतर विमानाच्या उजव्या बाजूच्या इंजिनला पक्षी धडकला. त्यामुळे इंजिनभ्येष गडबड असल्याचे पायटलच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ विमानाचे उड्डाण थांबवले. याबाबतची माहिती एअर ट्रॅफिक कंट्रोलला दिली. उड्डाणानंतर हा प्रकार घडला असता, तर मोठी दुर्घटना होण्याची शक्यता होती. या घटनेनंतर प्रवासी देखील घाबरले. विमान धावपट्टीवरून पुन्हा पार्किंग बे मध्ये आणण्यात आले. विमान रद्द केल्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.

पुणे-भुवनेश्वर विमानाबाबत प्रकार; दुर्घटना टळली

उपाययोजना कधी?

पुणे विमानतळावर बर्ड हिटच्या पाच वर्षांत १४५, तर या वर्षात आतापर्यंत ११ घटना घडल्या आहेत. बुधवारी घडलेली ही बारावी घटना आहे. गेल्या काही दिवसांपासून पुणे विमानतळाच्या धावपट्टीवर कुत्रा आडवा येणे, धावपट्टीच्या बाजूला मोर दिसणे, विमानतळ परिसरात कुत्र्यांचा वावर, बिबट्याचा वावर अशा घटना घडत आहेत. तरीही विमानतळ प्रशासन, हवाई दल गंभीर का नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.

> हवाई दल, एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया व पुणे मनपा या यंत्रणांनी आता तरी सुरक्षित विमानतळ पर्यावरणाच्या गरजेकडे अधिक गांभीर्याने लक्ष द्यावे. अशा घटना घडू नयेत यासाठी एकसंध व समन्वयाने उपाययोजना करणे गरजेचे आहे.
>
> - धैर्यशील वंडेकर, हवाई वाहतूक तज्ज्ञ

माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना कारावास

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

शिवसेनेचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव (४०) यांना पोलिस अधिकाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणात औरंगाबाद प्रमुख जिल्हा न्यायालयाने एक वर्ष कारावास आणि वीस हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.

स्थानिक हॉटेल प्राइडमध्ये ६ डिसेंबर २०१४ रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची बैठक सुरू असताना माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी जबरदस्तीने कक्षात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता. विशेष सुरक्षा पथकाचे पोलिस निरीक्षक पराग जाधव यांनी त्यांना थांबवले असता, हर्षवर्धन जाधव यांनी त्यांना कानशिलात मारली. याप्रकरणी सोनेगाव पोलिसांनी जाधव यांच्या विरुद्ध शासकीय कामात अडथळा आणि मारहाणीच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात जिल्हा न्यायाधीश आर. जे. राय यांनी निर्णय दिला.

जाधव हे न्यायालयीन सुनावणीस वारंवार गैरहजर राहत होते. त्यामुळे अटक वॉरंटही जारी करण्यात आला होता. अखेर १७ फेब्रुवारी रोजी ते न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांना कारागृहात पाठवण्यात आले. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकून आणि साक्षी तपासल्यानंतर न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले.

LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

सीआयएन : एल६५९२२एमएच१९८९पीएलसी०५४२५७.

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : १२१, मेकर टॉवर्स, "एफ" विभागसेस, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५ **दूरध्वनी :** + ९१ २२ २२१७८६००, **फॅक्स :** + ९१ २२ २२१७८७७७

ई-मेल : lichousing@lichousing.com **वेबसाईट :** www.lichousing.com

छत्तीसव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि रिमोट ई-व्होटिंग बरील माहिती

याद्वारे सूचना देण्यांत येते की, एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ('कंपनी') ची छत्तीसवी सर्वसाधारण सभा (एजीएम) **शुक्रवार, २९ ऑगस्ट, २०२५ रोजी दु. ३.३० वा.** व्हिडिओ कॉन्फरन्स ("व्हीसी")/ऑडर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") मार्फत होईल; कंपनी कायदा, २०१३ च्या प्रयोज्य तरतुदी सह वाचता नियम व्यवहार मंत्रालय (एमसीए) ने त्यांच्या ५ मे, २०२० दिनांकित जनरल सर्क्युलर क्र. २०/२०२० सह वाचता वेळी वेळी जारी केलेले त्यानंतरची सर्क्युलर्स व अलिकडचे २५ सप्टेंबर, २०२३ दिनांकित जनरल सर्क्युलर क्र. ०९/२०२३, १९ सप्टेंबर, २०२४ दिनांकित जनरल सर्क्युलर क्र. ०९/२०२४ (एमसीए सर्क्युलर) द्वारे ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत एका सामाईक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय केल्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी") किंवा ऑडर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") मार्फत घेण्याची परवानगी दिली आहे. कंपनी अधिनियम, २०१३ (अधिनियम) च्या तरतुदी, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (लिस्टींग रेग्युलेशन्स) व एमसीए सर्क्युलर्सच्या अनुपालनांत कंपनीची ३६वी एजीएम व्हीसी/ओएव्हीएम मार्फत आयोजित केली जाईल. एजीएमची कार्यवाही १३१, मेकर टॉवर्स, "एफ" विभागसेस, १३वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५, महाराष्ट्र येथे स्थित कंपनीच्या नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालयात आयोजित केल्याचे पुढील धरले जाईल.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०१ च्या तरतुदी सह वाचता त्या अंतर्गत बनवलेले नियम यास अनुसरून त्यांचे ई-मेल आयडीज कंपनीच्या रजिस्ट्रार ऑफ ट्रान्सफर एजंट्स म्हणजेच एमयुएमची इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) / डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स केले नोंदवले असतील त्या सर्व सभासदांना एजीएम निमंत्रणाची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठीचा वार्षिक अहवाल यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रती पाठवल्या आहेत.

ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडीज् कंपनी किंवा रजिस्ट्रार ऑड ट्रान्सफर एजंट किंवा डिपॉझिटरीज किंवा डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स केडे नोंदवले आहेत आणि ज्यांची नावे शुक्रवार, १ ऑगस्ट, २०२५ रोजीस लाभार्थी स्थान सूचीमध्ये आढळली त्या सर्व सभासदांना ईमेल द्वारे वार्षिक अहवाल पाठवले आहेत. सदर इलेक्ट्रॉनिक कंपनीची वेबसाईट www.lichousing.com वर आणि एमयुएफची इनटाईम इंडिया प्रा. लि. ची वेबसाईट https://instavote.linkintime.co.in/ वर अपलोड केले आहे. तथापि, जर सभासदानी सदर दस्तावेजांची एक सॉफ्ट कॉपी प्राप्त करण्याची इच्छा असेल तर त्याने / तीने त्याचा / तीचा डीपीआयडी आणि क्लायंट आयडी किंवा फोलिओ क्र. नमूद करून एक पत्र किंवा co_secretarial@lichousing.com वर एक ईमेल पाठवावा म्हणजे कंपनीच्या रजिस्ट्रार ऑड ट्रान्सफर एजंट ना त्याच्या / तिच्या विनंती ची पूर्तता करता येईल.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदी सह वाचता कंपन्याचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ चा नियम २० आणि सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ चे रेग्युलेशन ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया ने जारी केलेले सर्वसाधारण सभांवरील सेक्रेटरीयल स्टँडर्ड (एसएस-II) ला अनुसरून कंपनीला तिच्या भागधारकांना सदर सूचनेत मांडलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांचे मत देणे त्यांना शक्य व्हावे यासाठी इनटाव्हीट-एमयुएफची इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे पुरवलेल्या ई-व्होटींग सेवे मार्फत "रिमोट ई-व्होटींग" (म्हणजेच एजीएम च्या ठिकाणपेक्षा वेगळ्या जागेतून ई-व्होटींग) सुविधा पुरवताना आनंद होत आहे.

कंपन्याचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) सुधारणा नियम, २०१५ च्या नियम २० ला अनुसरून, कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून किंवा एजीएम मध्ये मत देण्याची सभासदांची पात्रता ठरवण्यासाठी "कट-ऑफ डेट" म्हणून शुक्रवार, २२ ऑगस्ट, २०२५ ही तारीख निश्चित केली आहे.

केवळ शुक्रवार, २२ ऑगस्ट, २०२५ हा कट-ऑफ रोजीस ज्यांचे नाव कंपनीच्या सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजची ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या विवरणात असेल तीच रिमोट ई-व्होटींगची सुविधा वापरण्यास किंवा एजीएममध्ये मत देण्यास हक्कदार असेल.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या तरतुदी व नियमांनुसार तपशील खालील प्रमाणे :

- ई-मेलद्वारे सूचना आणि आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठीचा वार्षिक अहवाल पाठवणे पूर्ण करण्याची तारीख : ०५ ऑगस्ट, २०२५.
- इलेक्ट्रॉनिक माध्यमातून रिमोट ई-व्होटींग सुरु होण्याची तारीख आणि वेळ : मंगळवार, २६ ऑगस्ट, २०२५ रोजी स.९.०० वा. (भारत).
- इलेक्ट्रॉनिक माध्यमातून रिमोट ई-व्होटींग संपण्याची तारीख आणि वेळ : गुरुवार, २८ ऑगस्ट, २०२५ रोजी सं. ५.०० वा. (भारत). आणि त्यानंतर, रिमोट ई-व्होटींग मॉड्युल, एमयुएफची इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कडून निष्क्रिय केले जाईल.
- ज्या सभासदांनी सभेपूर्वी रिमोट ई-व्होटींगने त्यांचे मत देले असे तो सभेला हजर राहू शकतात परंतु पुन्हा त्यांचे मत देण्यास हक्कदार नसतील आणि ई-व्होटींग मार्फत त्यांचे मत त्यांनी दिले नसेल त्या सभेस हजर असलेल्या सभासदांना इन्टाव्हीट मार्फत वार्षिक सर्वसाधारण सभेत मत देने शक्य होईल.
- ई-व्होटींग प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून कृती करण्यासाठी कंपनीने मे. बीपीपी अँड कं. कंपनी सेक्रेटरीज, पुणे (सभासदत्व क्र. एसीएस ३७३१२ व व्यवसाय प्रमाणपत्र क्र. १९९०२ आणि सेबत नोंदणी क्र. : एस २०१८ एएफ ५६५२००) यांची नियुक्ती केली आहे.
- घोषित झालेले निकाल त्वरित स्टॉक एक्सचेंजेस (एनएसई व बीएसई), एमयुएफची इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ला कळवले जातील आणि कंपनीची वेबसाईट www.lichousing.com वर प्रदर्शित केले जातील.
- ज्या व्यक्तींनी कंपनीने एजीएमची सूचना पाठवल्या नंतर कंपनीचे शेअर्स संपादित करून कंपनीची सभासद बनले असतील आणि त्यांचे नाव शुक्रवार, २२ ऑगस्ट, २०२५ हा कट-ऑफ डेट रोजीस कंपनीच्या सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या विवरणांत असेल ते एजीएम निमंत्रणाची सूचना कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.lichousing.com वर आणि एमयुएफची इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडची वेबसाईट https://in.mpms.mufg.com वर पाहू शकतात. असे सभासद ई-व्होटींग निर्देशांखाली एजीएमच्या सूचनेत नमुद केल्याप्रमाणे प्रक्रिया अनुसरून रिमोट ई-व्होटींग मार्फत त्यांचे मतदान अधिकार वापरु शकतात.
- रिमोट ई-व्होटींग संबंधातील कोणत्याही चौकशा/तक्रारी असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट-ई-व्होटींग, एमयुएफची इनटाईम इंडिया प्रा. लि., सी-१०१, २४७ पार्क, एलबीस मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०००८३, दू. ०२२-४९१८६०००, ई-मेल : enotices@in.mpms.mufg.com वेथे कराव्यात किंवा सभासद https://instavote.linkintime.co.in वेथील हेल्प सेक्शन अंतर्गत उपलब्ध क्लिकेटची आरूकड क्वेरचस (एफएक्युज) आमि ई-व्होटींग मॅन्युअल पहावे.

अन्य बाबी सोबत ई-व्होटींग ची प्रक्रिया आणि पध्दत दर्शवणारी एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल आणि लेखा हे सुध्दा कंपनीची वेबसाईट www.lichousing.com वर देखील उपलब्ध आहे.

व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएममध्ये सामील होण्यासाठी तपशिलवार निर्देश एजीएमच्या सूचनेत दिले आहेत. सभासदांनी कृपया ती काळजीपूर्वक पहावी. त्या सभासदांना एजीएमपूर्वी किंवा मध्ये सदस्य हवे असेल त्यांनी खालील ई-मेल आयडी वर एक विनंती पाठवावी.

कारण/कृती	ई-मेल आयडी
ई-व्होटींग	enotices@in.mpms.mufg.com instameet@in.mpms.mufg.com /
ई-मेल आयडी व बँक खाते तपशीलांची नोंदणी/ कॉर्पोरेट सभासदांची त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन करण्याची इच्छा / वक्ता म्हणून नोंदणी/ दस्तावेजांचे निरीक्षण	enotices@in.mpms.mufg.com
ही सूचना पाठवल्यानंतर जीने कंपनीचे शेअर्स संपादन करून कंपनीची एक सभासद बनले व जीची सभेत मत देण्याची इच्छा असेल ती व्यक्ती.	insta.vote@linkintime.co.in

संचालक मंडळाच्या आदेशावरून
एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड साठी
सही/ -
वर्षा हरदासानी
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी

ठिकाण: मुंबई
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२५

मालेगावात बांगलादेशी, रोहिंग्यांची घुसखोरी नाहीच!

मालेगाव: तब्बल सात महिन्यांच्या चौकशीनंतर एसआयटीने बहुचर्चित बनावट जन्मप्रमाणपत्र घोटाळ्याचा सात पानी अंतिम तपास अहवाल तयार केला आहे. विशेष तपास समितीने कागदपत्रांच्या त्रुटी, पुराव्यांच्या पडताळणीत कसूर, बनावट कागदपत्रे वापरल्याचा ठपका ठेवत एकही बांगलादेशी, रोहिग्या मुस्लिम अजंदार सापडला नसल्याचे अहवालात नमूद केल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे.

समितीचे सदस्य सचिव अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांनी विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांना अहवाल सादर केला आहे. कराळे येत्या ८ ऑगस्टपर्यंत अहवाल शासनाला सादर करणार आहेत. लोकसभा निवडणूकीनंतर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी व्होट जिहादचा आरोप करीत जन्म प्रमाणपत्र घोटाळा उघडकीस आणला होता .मालेगावातून साडेचार हजार घुसखोरांना जन्म प्रमाणपत्र मिळवल्याचा सोमय्या यांनी दावा केला होता. या आरोपाची दखल घेत राज्याच्या गृह विभागाने ८ जानेवारी २०२५ रोजी चौकशीसाठी विशेष समिती नेमली होती. या समितीला चौकशीसाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली होती.

पुणे आयुक्तांच्याच बंगल्यात चोरी

पुणे : पुणे महापालिका आयुक्तांच्या बंगल्यातून चक्क महागडी झुंबरे, शोभेच्या वस्तू, टीव्ही, एसी व अन्य विद्युत उपकरणे गायब झाली आहेत. याबाबत महापालिकेने प्रचंड गोपनीयता पाळली असून, याबाबत तक्रार अथवा गुन्हा दाखल झालेला नाही. दुसरीकडे नव्याने या वस्तू खरेदी करण्यासाठी २० लाख रुपयांच्या निविदांची प्रक्रिया सुरू झाली आहे; परंतु सीसीटीव्हीसह, सुरक्षारक्षकांच्या गराड्यात असलेल्या या बंगल्यातून हे साहित्य गायब झालेच कसे, याची चर्चा रंगली आहे.

महापालिका आयुक्तांसाठी मॉडेल कॉलनीतील चित्तरंजन वाटिकेशेजारी मोठा बंगला बांधण्यात आला आहे. महापालिकेतून निवृत्त झालेले डॉ. राजेंद्र भोसले या बंगल्यात राहत होते. त्यांनी जून महिन्याच्या अखेरीस या बंगल्याचा ताबा सोडला होता.

४४ कोटी गेले 'डब्ब्यात'!

(पान एकवरून)

असल्याने व्यापारी आणि गुंतवणूकदार यांच्या नातेवाइकांनी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि सुरुवातीला सुमारे दोन कोटी रुपये गुंतविले. या गुंतवणुकीवर चांगला मोबदला मिळाल्याने या व्यापाऱ्याचा तघांवरील विश्वास अधिक दृढ झाला.

एकही धनादेश वटला नाही

व्यापारी आणि एप्पाच्या नातेवाइकांनी त्यानंतर ए्प्पाटप्प्याने ३६ किलो सोने आणि सुमारे १० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. मात्र, यावर कोहीच परतावा न मिळाल्याने त्यांनी तिघांकडे तगादा लावला. त्यावेळी तिघांनी वेगवेगळ्या बँक खात्यांचे धनादेश दिले. मात्र, यातील एकही धनादेश वटला नाही. या तिघांनी सुमारे ४४ कोटींचा ऐवज डब्बा ट्रेडिंगमध्ये गमावल्याचे व्यापाऱ्याला कळले. त्यावरून त्यांनी लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात तक्रार केली. त्यांच्या तक्रारीवरून लाटूलाल, पल्लव आणि शुभम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

लुपिन लिमिटेड

LUPIN

नोंदणीकृत कार्यालय : ३रा मजला, कल्पतरु इन्स्पायर, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५.

कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L24100MH1983PLC029442

दूर.: (९१-२२) ६६४० २३२३ ईमेल: info@lupin.com वेबसाइट: www.lupin.com

३० जून, २०२५ ला संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण

(₹ टक्केवारीत)

तपशील	३०/०६/२०२५ ला संपलेली तिमाही (अलेखापरिक्षित)	३१/०३/२०२५ ला संपलेली तिमाही (लेखापरिक्षित) (टीप ३ पहा)	३०/०६/२०२४ ला संपलेली तिमाही (अलेखापरिक्षित)	३१/०३/२०२५ ला संपलेले वर्ष (लेखापरिक्षित)
१) प्रचलनातून एकूण महसूल	६२,६८३.४	१६,६७१.३	५६,००३.३	२२७,०४९.०
२) करपूर्व कालावधीकरिता निवळ नफा/(तोटा)(अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपूर्वी आणि नंतर)	१४,१५५.४	८,९५८.४	९,९३०.३	४०,१५०.०
३) करानंतरच्या कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा)(अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतर)	१२,२१४.६	७,८२३.८	८,०५५.४	३३,०६२.६
४) कंपनीच्या मालकांना देय असलेल्या करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा)	१२,१९०.३	७,७२५.२	८,०१३.१	३२,८१६.२
५) कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न/(तोटा) [कालावधीकरिता (करानंतर) नफा/(तोटा) आणि इतर व्यापक उत्पन्न/(तोटा) (करा नंतर) समाविष्ट]	१३,४७३.०	७,९४८.६	७,५२९.०	३९,९०९.९
६) भरलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹२/- प्